नियमित फौजदारी खटला क्र.४७/२०२६

निशाणी क्र. २४

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ०४ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नावः | – | प्रमोद नानासाहेब देशमुख |
| वय | – | ३२ वर्षे, व्यवसाय– नोकरी, |
| नेमणुक | – | स्थानिक गुन्हे शाखा, लातूर. |

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. व्ही.एन.मेहेत्रे यांचे मार्फत सुरुः–**

मी स्प्टेंबर २०२५ पासून स्थानिक गुन्हे शाखा, लातूर येथे पोलीस उपनिरीक्षक या पदावर कार्यरत आहे. दि.३०/११/२०२५ रोजी मी आणि सहाकारी ए.पी.आय भुजबळ, पी.एस.आय घाडगे व पोलीस अंमलदार यांच्यासोबत पेट्रोलिंग करत असतांना जुना रेणापुर नाका येथे गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, लातूर ते रेणापुर जाणाऱ्या रोडवरील एम.आय.टी कॉलेज समोर एक शिकलकरी इसम चोरीतील वस्तु विक्रीसाठी घेऊन आल्याचे समजले. पंचाना पुर्वकल्पना देऊन आम्ही सर्वजण एम.आय.टी कॉलेज समोर रोडवर गेलो. सापळा लावून थांबलो असता मिळालेल्या बातमीधील वर्णनाप्रमाणे एक इसम दिसुन आला. त्याच्याकडे एक पांढऱ्या रंगाचे पोते होते. त्याच्याकडील पोत्याची पाहणी केली असता त्यामध्ये चांदीचे पैंजन, करदोडे, अंगठया दिसुन आल्या. त्याच्याकडे त्या मुद्देमालाबाबत चौकशी केली असता त्याने अहमदपुर येथील वैष्णवी ज्वेलर्स आणि मदनसुरी येथील सोन्या चांदीचे दुकानातून त्याच्या साथीदारासह दुकान फोडून चोरी केल्याचे सांगितले. पंचाच्या समक्ष त्या इसमाकडील चांदीच्या वस्तु जप्त केल्या. त्या वस्तु जप्त

केल्याचा पंचनामा केला. (आता मला दि.३०.११.२०२५ रोजीच्या जप्ती पंचनाम्याची सत्यप्रत दाखवण्यात आली.) त्या पंचनाम्याची मुळ प्रत अहमदपुर पोलीस स्टेशनमध्ये दिली होती. सदर प्रत अहमदपुर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांनी दिलेली सत्यप्रत असुन त्या पत्रावर अहमदपुर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांची सही आहे. त्यामधील मजकुर खरा व बरोबर आहे. त्या पंचनाम्यावर दोन पंचाच्या आणि माझी सही आहे. तसेच त्याच्यावर आरोपीचा अंगठा आहे. त्यामधील मजकुर खरा व बरोबर आहे. (सदर पंचनाम्याची प्रत मुळ प्रत नसल्याने सदर पंचनाम्यास निशाणी देण्यास आरोपीच्या विधीज्ञांनी आक्षेप घेतला. सदर मुळ पंचनामा हा दुसऱ्या गुन्हयात दाखल असल्याने त्याची सत्यप्रत प्रस्तुत कामात दाखल केली आहे. सत्यप्रत हा दुय्यम पुरावा असलयाने तो ग्राहय धरता येईल. त्यामुळे सदर पंचनाम्यास निशाणी देण्यात आली.) त्यास **निशाणी क्र.२५** देण्यात आली. लातूर जिल्हयातील पोलीस स्टेशनमध्ये सदर गुन्हयासंदर्भात तक्रारी दाखल आहेत का याची चौकशी केली. अहमदपुर पोलीस स्टेशन मध्ये दोन आणि कासारसिरसी पोलीस स्टेशनमध्ये एक चोरीचा गुन्हा दाखल असल्याचे आढळून आले. त्यानंतर सदर आरोपीस मुद्देमालासह अहमदपुर पोलीस स्टेशनमध्ये रिपोर्टसह हजर केले होते. (आता मला दि.३०.११.२०२५ रोजीचे पत्राची सत्यप्रत दाखवण्यात आली.) त्या पत्राची मुळ प्रत अहमदपुर पोलीस स्टेशनमध्ये दिली होती. सदर प्रत अहमदपुर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांनी दिलेली सत्यप्रत असुन त्या पत्रावर अहमदपुर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांची सही आहे. त्यामधील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.२६** देण्यात आली. एम.आय.टी

कॉलेज समोर चांदीच्या वस्तुसह मिळुन आलेल्या त्या इसमास मी ओळखतो. (आरोपी व्ही.सी. वर हजर आहे). साक्षीदाराने व्ही.सी. वरील आरोपी तो इसम असल्याचे ओळखले.

२. आरोपीकडून जप्त केलेल्या मुद्देमालापैकी कासारसिरसी पोलीस स्टेशन मध्ये नोंद असलेल्या गुन्हयात १०८ पैंजण जोड दिले होते. १०८ पैंजण जोड मदनसुरी येथुन चोरी केल्याचे आरोपीने सांगितले होते. त्या आरोपीकडून जप्त केलेल्या वस्तुमधील १०८ पैंजण जोड दाखवल्यास मी ओळखु शकतो. (आता मला प्रस्तुत गुन्हयातील मुद्देमाल व्ही.एम.आर नं.२८/२०२६ मधील १०८ पैंजण जोड दाखवण्यात आले.) तो मुद्देमाल आरोपीकडून जप्त केलेल्या मुद्देमालातील १०८ पैंजण आहेत.

**उलटतपास आरोपीतर्फे अॅड.एच.व्ही.गायकवाड यांच्यामार्फत सुरु ः–**

३. प्रश्न – निशाणी २५ आणि २६ ची मुळ प्रत तुम्ही अहमदपुर पोलीस स्टेशनमध्ये शोधली का ?

उत्तर –त्या दोन प्रती मुळ प्रती आम्ही अहमदपुर पोलीस स्टेशला दिल्या होत्या.

निशाणी २५ व २६ वरील सहया या झेरॉक्स आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्या सहया माझ्या आहेत हे मला ओळखता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी २६ आणि २५ ची मुळ प्रत पाहिल्याशिवाय त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे का हे मला सांगता येत नाही.

०४. मी आरोपीचे निवेदन नोंदवलेले नव्हते. निशाणी २५ मधील परिच्छेद क्र.५

मध्ये परिच्छेद क्र.४ प्रमाणे नमुद आहे. जप्त वस्तुंचे वजन अहमदपुर येथील सोनाराकडे केले होते. त्याचे नाव मला आठवत नाही. त्या सोनाराकडून वजन आणि धातूचे प्रमाणपत्र घेतले होते. ते प्रमाणपत्र मी अहमदपूर पोलीस स्टेशनमध्ये जमा केले होते. त्याची सत्यप्रत मी ठेवलेली नाही. त्या वस्तु मी खपटी बॉक्समध्ये जप्त केल्या होत्या. तो बॉक्स सिलबंद केला होता. दि.३०/११/२०२५ रोजी अहमदपुर येथील सोनाराजवळ बॉक्स उघडला होता. ती बॉक्स उघडल्याची वेळ मला सांगता येत नाही. ते मोजमाप करण्यासाठी दीड तास वेळ लागला. त्यानंतर तो बॉक्स पुन्हा सिलबंद करुन अहमदपुर पोलीस स्टेशनचे मुद्देमाल सांभाळणाऱ्या कॉन्स्टेबलकडे दिला. बॉक्स उघडून सिलबंद केल्याचा पंचनामा केला नव्हता. सोनाराकडून मुद्देमाल तपासण्याचा अहवाल माझ्याकडे नाही. त्या पैंजवरील स्टॅम्प कोणाचा होता हे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी २५ मध्ये जप्त पैंजणचा उल्लेख नाही. साक्षीदार पुन्हा सांगतो की, निशाणी २५ मध्ये चैन असा शब्द झेरॉक्समुळे उमटलेला नाही. निशाणी २५ वरील अंगठा कोणाचा आहे त्याचे नाव सदर पंचनाम्यामध्ये नमुद आहे. हे म्हणणे खरे नाही की, तो अंगठा आरोपीचा आहे असा दस्तुर केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, जप्त वस्तु आरोपीच्या ताब्यातून जप्त केलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने त्या वस्तु कोणत्या दुकानातून चोरी केल्या आहेत हे मला सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, जप्त वस्तु आरोपीकडून पंचनामा करुन जप्त केल्या होत्या असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा अहवाल दिला होता. निशाणी २५ व २६ त्या सत्यप्रती मी स्वतः घेतलेल्या नव्हत्या. त्या कोणी केल्या त्याचे नाव मला सांगता येत

नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही**

**सदर साक्षीदारचा जबाब आरोपीस व्ही.सी द्वारे हजर केल्यानंतर नोंदवण्यात आला. सदर जबाब नोंदवतेवेळी ऑडिओ व व्हीडीओ सुस्थितीत चालु होता.**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by APARNA SHIVAJI GUNJAVATE
Date: 2026.02.27 11:02:45 +0530

(**श्रीमती.ए.एस.गुंजवटे**)

दिनांक–२६/०२/२०२५. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२,
निलंगा